**एस.एस.छल्लाणी प्र.वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्रं. १ यांचे न्यायालय चांदवड.**

**आर. सी. सी. क्रं. ०४/२०२४**
**सरकार वि. शंकर** + १.
**निशाणी– २२.**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची जबानी.</u>**
**<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**
**<u>माझे नाव</u>** – संगिता अंबादास गांगुर्डे,
**<u>वय</u>**– ४३ वर्ष– धंदा– शेती.
**<u>राहणार</u>** – कोकणखेडे, ता. चांदवड, जि. नाशिक.

.........................................................................................................

**<u>सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

**०१.** दिनांक ११/१०/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वाजता दरम्यान पैशाच्या हिशोबावरुन परशराम गांगुर्डे माझ्या पतीला सांगण्याकरीता घराच्या पाठीमागे आला होता. त्यावेळी मिराबाई हिने सुनबाई उषाला लोटलाट केली. त्यामुळे तीला त्रास होत होता. तिला सातवा महिना सुरु होता. तीला मिराबाईने खाली पाडल्याने त्रास होत होता. तीला चांदवड येथे रुग्णालयात आणले व तेथुन मालेगांव येथील रुग्णालयात नेले. त्यानंतर फिर्याद दिली. मी आरोपींना ओळखते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. व्ही. एस. व्यवहारे वकिल यांच्यामार्फत सुरु.</u>**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ माझा पुतन्या व आरोपी क्र. २ भावजाई आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुलाचे लग्न झाले त्यावेळी पतीने परशरामकडून हातउसनवार रक्कम घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, परशराम याला रक्कम दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे व माझे शेत बांधाला बांध लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घराला घर लागुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, घराच्या पाठीमागे पोलीस पाटलांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे घराच्या पाठीमागून आरोपींचा येण्या जाण्याचा रस्ता आहे. हे मला माहिती नाही की, आरोपी

क्र २ हिला पाच सहा वर्षापुर्वी पक्षघाताचा झटका आला होता व तीचे पुर्ण शरीर काम करत नाही किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, हि तक्रार दाखल करण्यापुर्वी आरोपींनी दिनांक १०/१०/२०२३ रोजी आमच्या विरुदध चांदवड पोलीस स्टेशन येथे पैशाच्या वादावरुन मारहाण झाल्याबाबत तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपींना शह देण्यासाठी खोटी तक्रार आम्ही दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, परशराम पैशे परत मागत होता व त्याचा आम्हाला राग आला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडली नसतांना आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दिली आहे.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात संपुर्ण खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मिराबाई हिने सुनेला खाली पाडले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी सुन शेती काम करीत असताना पाय घसरुन खाली पडली व तिला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडली नसताना आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दिली आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास काही नाही.**

वा. दा. क. केले.

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.04.09 15:34:49 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड

समक्ष

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.04.09 15:34:54 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड

**दिनांक – ०९/०४/२०२६**